**ठळक बातम्या**

- संसदेच्या विस्तारित अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या तीन दिवसीय विशेष सत्राला प्रारंभ

- राज्यसभेत नवनिर्वाचित १६ सदस्यांचा शपथविधी

- प्रधानमंत्र्यांची ऑस्ट्रियाचे चॅन्सेलर क्रिस्तियन स्टॉकर यांच्याशी प्रतिनिधी मंडळ स्तरावर चर्चा/ उभयपक्षी महत्त्वाच्या करारांवर झाल्या स्वाक्षऱ्या

- महाराष्ट्र विधान परिषदेच्या ९ जागांसाठी निवडणूक कार्यक्रम जाहीर/ १२ मे रोजी मतदान

**आणि**

- आंध्रप्रदेशातल्या कुरनूल जिल्ह्यात झालेल्या रस्ते अपघातात आठ जणांचा मृत्यू /दहा जण जखमी

**<><><><><>**

महिला आरक्षण विषयक विधेयकासाठी संसदेच्या विस्तारित अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या तीन दिवसीय विशेष सत्राला आज प्रारंभ झाला. सभागृहात अबू हासेम खान चौधरी, मोहसिना किडवाई आणि हरी नारायण राजभर तसंच दिवंगत गायिका आशा भोसले यांना श्रद्धांजली वाहण्यात आली आणि त्यानंतर कामकाजाला सुरुवात झाली.

केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी ‘केंद्रशासित प्रदेश’ (सुधारणा) विधेयक २०२६ प्रस्ताव लोकसभेत सादर केला. विधी आणि न्याय मंत्री अर्जुन राम मेघवाल यांनी संविधानाची १३०वी दुरुस्ती विधेयक तसंच, मतदारसंघ पुनर्रचना विधेयक मांडण्याचा प्रस्ताव लोकसभेत सादर केला. हा प्रस्ताव २०७ विरुद्ध १२६ मतांनी मंजूर झाला. या विधेयकांमुळे देशाच्या संघराज्य रचनेला धक्का पोहोचेल, असा आरोप करत काँग्रेसचे खासदार के. सी. वेणुगोपाल यांनी ही विधेयकं सादर करायला विरोध केला. मात्र, वेणुगोपाल हे विधेयक सादर करण्यावर केवळ तांत्रिक आक्षेप घेऊ शकतात, परंतु विधेयकांच्या गुणवत्तेवर बोलू शकत नाहीत, असं प्रत्युत्तर गृहमंत्री अमित शहा यांनी दिलं. आधी जनगणना होणं गरजेचं आहे, असं सांगताना ही विधेयकं इतक्या तातडीने आणण्याची गरज काय, असा प्रश्न समाजवादी पक्षाचे नेते अखिलेश यादव यांनी उपस्थित केला.

राज्यसभेत आज विनोद तावडे, नितीन नबीन, अभिषेक मनु सिंघवी, तेराश गोवाल्ला, जोगेन मोहन, प्रमोद बोरो, लक्ष्मी वर्मा, शिवेश कुमार, रामनाथ ठाकूर, उपेंद्र कुशवाह, अनुराग शर्मा, संजय भाटिया,

करमवीर सिंग बौध, फुलो देवी नेतम, या नवनिर्वाचित सदस्यांनी शपथ घेतली. विनोद तावडे यांनी मराठीत शपथ घेतली.

**- - होल्ड..बाईट - विनोद तावडे - - -**

राज्यसभेत आज तालिका सदस्यांची फेरनिवड झाली. ही नियुक्ती १५ एप्रिलपासून लागू झाली आहे. यात भाजपचे दिनेश शर्मा, एस. फांगनोन कोन्याक आणि घनश्याम तिवारी, काँग्रेसच्या फुलो देवी नेतम, अण्णा द्रमुकचे एम. तंबीदुराई आणि बिजू जनता दलाचे सस्मित पात्रा यांचा समावेश आहे. यानंतर राज्यसभेचं कामकाज दिवसभरासाठी तहकूब करण्यात आलं.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज ऑस्ट्रीयाचे चॅन्सेलर डॉ क्रिस्तियन स्टॉकर यांच्याशी प्रतिनिधीमंडळ स्तरावर चर्चा केली. स्टॉकर यांच्या भेटीमुळे गुंतवणूक आणि व्यापार क्षेत्रात भारत ऑस्ट्रीया संबंधांना नवी ऊर्जा मिळेल असं प्रधानमंत्री मोदी यांनी नंतर संयुक्त निवेदनात सांगितलं.

**- - - होल्ड बाईट- - - -**

सध्याच्या तणावपूर्ण वातावरणात, लष्करी संघर्षाऐवजी शांततेचा पर्याय निवडण्यावर दोन्ही राष्ट्रांची सहमती झाल्याचं प्रधानमंत्री मोदी यांनी सांगितलं.

उभय देशांमधे विविध क्षेत्रातल्या समझोता करारांवर यावेळी स्वाक्षऱ्या झाल्या. त्या आधी प्रथमच भारत दौऱ्यावर आलेले स्टॉकर यांचं प्रधानमंत्री मोदी यांनी स्वागत केलं.

**<><><><><>**

विकसित भारताचं स्वप्न साकार करण्यासाठी हे स्वप्न तरुण विद्यार्थ्यांनी पाहणं आवश्यक आहे असं राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी म्हटलं आहे. वर्धा जिल्ह्यातल्या सेवाग्राम इथं महात्मा गांधी आंतरराष्ट्रीय हिंदी विद्यापीठाच्या दीक्षांत समारंभात त्या बोलत होत्या.

राज्यपाल जिष्णु देव वर्मा, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे, वर्ध्याचे पालकमंत्री पंकज भुयार आणि इतर मान्यवर कार्यक्रमाला उपस्थित होते.

<><><><><>

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या ९ जागांसाठी १२ मे रोजी मतदान होणार असल्याचं निवडणूक आयोगाने आज जाहीर केलं. भारत निवडणूक आयोगाने आज विधानपरिषदेसाठीच्या द्वैवार्षिक निवडणुकीसाठीचा कार्यक्रम जाहीर केला. त्यानुसार या निवडणुकीसाठी २३ ते ३० एप्रिल या कालावधीत उमेदवारी अर्ज भरता येतील. २ मे ला अर्जांची छानननी होईल, ४ मे पर्यंत अर्ज मागे घेता येतील. आणि १२ मे ला सकाळी ९ ते दुपारी ४ या वेळेत मतदान होईल. विधानपरिषदेचे हे ९ सदस्य महाराष्ट्र विधानसभेच्या सदस्यांकडून निवडले जाणार आहेत.

येत्या १३ मे ला माजी मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, विधानपरिषद उपसभापती नीलम गोऱ्हे, शशिकांत शिंदे, संजय केनेकर, संदीप जोशी, दादाराव केचे, अमोल मिटकरी, राजेश राठोड आणि रणजीतसिंह मोहिते हे सदस्य निवृत्त होत आहेत.

<><><><><>

२०२७ च्या जनगणने अंतर्गत पहिल्या टप्प्यातल्या गृहगणनेला आजपासून प्रत्यक्ष सुरुवात झाली. अंदमान - निकोबार, गोवा, कर्नाटक, लक्षद्वीप, मिझोराम, ओडिशा आणि सिक्कीम या राज्यांमध्ये तसंच नवी दिल्ली महानगरपालिका आणि दिल्ली कटक मंडळ या भागात महिनाभर ही मोहीम राबवली जाईल. या काळात प्रगणक घरोघरी जाऊन माहिती संकलित करतील.

पहिल्यांदाच सुरू करण्यात आलेल्या स्वयं गणना सुविधेला उत्साहवर्धक प्रतिसाद मिळाला असून आतापर्यंत १२ लाख कुटुंबांनी आपली माहिती नोंदली आहे.

<><><><><>

विद्यापीठ अनुदान आयोगानं देशभरातली विद्यापीठं आणि महाविद्यालयांमध्ये नारी शक्ती वंदन अधिनियमाबद्दल जनजागृती करणारे कार्यक्रम आयोजित केले आहेत. लिंगभाव समानता, संवैधानिक मूल्य तसंच निर्णय प्रक्रियेत महिलांना समान प्रतिनिधित्व या मुद्द्यांवर संवाद घडवून आणण्याच्या दृष्टीनं देशभरातल्या सातशे सत्त्याहत्तर शैक्षणिक संस्थांमध्ये आयोजित केलेल्या अशा कार्यक्रमांमध्ये सुमारे १ लाख जण सहभागी झाले होते.

<><><><><>

इराणकडून अण्वस्त्रं निर्मिती सामग्री काढून घेणं आणि त्यांचे अण्वस्त्र प्रकल्पं थांबवणं हेच इस्रायल आणि अमेरिकेचं उद्दिष्ट आहे, असं इस्रायलचे प्रधानमंत्री बेन्यामीन नेतन्याहू यांनी स्पष्ट केलं. इराणसोबत सुरू असलेल्या वाटाघाटींची माहिती अमेरिका आपल्याला देत आहे असंही नेतन्याहू यांनी सांगितलं. या प्रकरणात पुढे काय होईल हे आताच सांगणं घाईचं ठरेल, मात्र इस्रायल कोणत्याही परिस्थितीला सामोरं जायला  तयार आहे, असं त्यांनी सांगितलं. अमेरिकेच्या मध्यस्थीने लेबननसोबतही वाटाघाटी सुरू असल्याचं नेतन्याहू यांनी सांगितलं.

दुसरीकडे आपल्या अणु संवर्धन करण्याच्या अधिकारांसोबत इराण अजिबात तडजोड करणार नाही असं इराणचे परराष्ट्र व्यवहार मंत्रालयाचे प्रवक्ता इस्माईल बकई यांनी तेहरान मधे वार्ताहरांशी बोलताना सांगितलं. आंतरराष्ट्रीय कायद्यानुसारच इराण अणुसंवर्धन कार्यक्रम राबवत आहे, हा इराणचा अधिकार असून इतर कुठलाही देश इराणवर दबाव आणू शकत नाही असं ते म्हणाले.

**<><><><><>**

आंध्रप्रदेशातल्या कुरनूल जिल्ह्यात आज सकाळी झालेल्या रस्ते अपघातात आठ जणांचा मृत्यू झाला तर दहा जण जखमी झाले आहेत.   कर्नाटकातल्या भाविकांना घेऊन जाणाऱ्या टेम्पोची एका लॉरीला धडक बसल्यामुळे हा अपघात झाला. जखमींवर कुरनूल इथल्या रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी या दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं आहे. प्रधानमंत्री मदत निधीतून मृतांच्या कुटुंबांना प्रत्येकी दोन लाख रुपये आणि जखमींना ५० हजार रुपये मदत  देण्याची घोषणा प्रधानमंत्र्यांनी केली आहे. आंध्र प्रदेशाचे मुख्यमंत्री एन चंद्राबाबू नायडू यांनीही दुर्घटनेबद्दल दुःख व्यक्त केलं असून जखमींवर योग्य उपचार होतील याची काळजी घेण्याचे निर्देश प्रशासनाला दिले आहेत.

**//<><><><><>//**